# साकार

# SAKAR

Society for Adoption Knowledge Awareness & Resource

## वार्षिक अहवाल

## एप्रिल २०२१ ते मार्च २०२२

# साकार

# SAKAR

**S**ociety for **A**doption **K**nowledge **A**wareness & **R**esource

“अजमेरा कॉम्पलेक्स”, प्लॉट नं. १७७, ज्योतीनगर मेन रोड,
ज्योतीनगर, औरंगाबाद - ४३१ ००५ (म. रा.)
फोन नं. - (०२४०) २३४७०९९, मो. नं. - ९६७३१०१७६०
ई-मेंल - sakaradoption@gmail.com,
वेबसाईट -www.sakar.org.in

## वार्षिक अहवाल

## एप्रिल २०२१ ते मार्च २०२२

Income Tax Exemption Certificate (80G)

No. AAGTS1368FF20214

FCRA Registration No. 08375011 (Social)

Registered under the Societies Registration Act 21 of 1860

No. MAHA/599/96/A’ BAD

&

Bombay Public Trust Act of 1950

Registration No. AF-3875 (A’ BAD)

# प्रास्ताविक

**सस्नेह नमस्कार,**

समस्त विश्वाला वेठीस धरणा-या कोव्हीड-१९ हि महामारी सरल्यावर, जग हळूहळू पूर्वपदावर येण्याचे प्रयत्न करत असतांना, साकारही भविष्याचा वेध घेत, झालेल्या आघातावर विचार-मंथन करुन मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत आहेत.

माणुसकी, निःस्वार्थभाव, समर्पण, साधेपणा, शिस्तप्रिय, स्वावंलंबन हे या संस्थेचे अंकित आहे, हीच भावना कायम ठेवून साकार संस्था गेल्या २८ वर्षापासून अविरत कार्य करत आहे. हे वर्ष संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे निवडणुकीचे नियोजित वर्ष होते व निवडणुक बिनविरोध झाली. हे कार्यकारी मंडळ पुढील पाच वर्ष कार्यरत राहील.

या वर्षात झालेल्या दत्तक विधानामध्ये दत्तक विधान म्हणून एका विशेष काळजीची गरज असलेल्या बालकाच्या दत्तक विधनाचा उल्लेख करावा लागेल. अनेक व्याधीनी ग्रस्त असलेल्या या बालकाचे कायदेशीर दत्तक विधान अमेरीका येथील एका दत्तकेच्छुक दाम्पत्यांच्या कुटुंबात पूर्ण करुन त्याचे लिव्हर प्रत्यारोपन करुन आज हे बालक त्यांच्या कुटुंबात आनंदाचे जीवन व्यतित करते आहे.

हे वर्ष आमच्यासाठी अजुन एका गोष्टीसाठी महत्वाचे आहे ते म्हणजे लिकेंज ॲडॉप्शनची सुरुवात या उपक्रमा अंतर्गत ०६ ते १८ वयोगटाच्या बालगृहातील बालकांना दत्तक विधीमुक्त करुन त्या बालकांचे साकार संस्थेमार्फत दत्तक विधान केले जाते. हे आव्हानात्मक काम आहे, त्यासाठी बालकांचे व दत्तकेच्छुक पालकांचे मानसोपचार तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांच्या सहकार्याने बालकांचे दत्तकविधानाव्दारे पुनर्वसन करण्यात येते.

दरवर्षी प्रमाणे आम्ही या वर्षी दत्तक जाणीव जागृती सप्ताह मोठया उत्साहात साजरा केला. उदघाटन प्रसंगी प्रसिध्द मनोविकार तज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी हे लाभले होते. त्यांनी साकारच्या कामाबददल तोंड भरुन कौतुक केले. सप्ताहातील इतर दिवसांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. आणि त्याचा आढावा अहवालात देण्यात आला आहे.

सदिच्छा भेटींमधील उल्लेखनीय भेट म्हणजे मॅन एनर्जी सोल्युशनच्या सामाजिकदायित्व समिती सदस्यांनी दुस-यांदा साकारला निधी उपलब्ध करुन दिल्यामुळे त्यांचे हार्दिक आभार.

त्याचप्रमाणे औरंगाबाद इलेक्ट्रीकल्स या कंपनीने सुध्दा त्यांच्या दायित्वनिधीमधून तीन वर्षासाठी सहाय्य केले आहे. आम्ही त्यांचेपण ऋणी आहोत.

साकार संस्थेच्या कार्यात विशेष सहकार्य करणारे औरंगाबाद येथील बाल कल्याण समितीचे अध्यक्ष/सदस्य, महिला व बाल विकास आयुक्तालय, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, जिल्हा बाल संरक्षण कक्ष व मा. जिल्हा व सत्र न्यायालय औरंगाबाद या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद.

अतिशय तळमळीने काम करणारे साकारचे कर्मचारी व आया, निःस्वार्थपणे व समर्पित भावनेने काम करणारे साकारचे कार्यकारी सभासद व वर्षानुवर्ष साकार संस्थेस तत्परतेने व्यवसायिक सेवा पुरविणारे, सर्व शुभचिंतकांचे अंतःकरण पूर्वक ऋणनिर्देश. त्यामुळेच आम्ही ठामपणे उभे आहोत. या कामात निरंतर सर्वांच्या सदिच्छा व साथ मिळावी हि अपेक्षा.

**सुचित्रा देशपांडे**
सचिव
साकार संस्था, औरंगाबाद

# शिशु संगोपन गृह

'शिशु संगोपन गृह' हे साकार संस्थेत प्रवेशित होणाऱ्या ० ते ६ वर्ष वयोगटातील प्रत्येक बाळाचे दत्तका पूर्वीचे 'घर' आहे. बालक पूर्णतः अनाथ असेल किंवा मातेने परित्याग केले असेल किंवा पालकांनी अव्हेरलेले असेल तर बाल कल्याण समितीच्या आदेशानुसार शिशू संगोपन गृहात दाखल केले जाते. वीस बालकांची क्षमता असलेल्या या शिशु गृहात बालकांच्या शारीरिक वाढीसाठी, ज्याप्रमाणे पोषक आहार आणि आरोग्याची काळजी घेतली जाते त्याच प्रमाणे मानसिक विकासासाठी उत्तेजना आणि समुपदेशन यासारख्या सेवा पुरविल्या जातात. तसेच त्यांच्यासाठी शैक्षणिक आणि मनोरंजनाच्या सुविधा पण उपलब्ध करून दिल्या जातात.

पुर्णतः अनाथ, मातेने परीत्याग केलेले किंवा पालकांनी अव्हेरलेल्या बालकांचा प्रवेश आणि त्यांच्या दत्तक विधानाची सद्यस्थिती खाली दर्शविलेल्या सांख्यिकीच्या आधारे स्पष्ट होईल.

## प्रवेशित बालकांचा तपशील
### (३१ मार्च २०२१ पर्यंत)

| अ.क्र. | प्रवेशाचा प्रवर्ग | मुले | मुली | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | परीत्यागीत (Relinquish) | ०५ | ०३ | **०८** |
| २ | सापडलेले (Abandon) | ०३ | ०४ | **०७** |
| ३ | दत्तक प्रक्रियेत असलेली बालके | ०० | ०१ | **०१** |
| | **एकुण** | **०८** | **०८** | **१६** |

साकार शिशु गृहात ३१ मार्च २०२१ रोजी एकुण १८ बालके होती त्यात ०८ मुले (०५ परित्यागीत व ०३ सापडलेली) आणि ०७ मुली (०३ परित्यागीत व ०४ सापडलेली) होत्या. एकुण १६ प्रवेशित बालकांपैकी ०६ बालकांचे दत्तक विधान पुर्ण झाले असून ०३ बालकांना वयाची ०६ वर्ष पुर्ण झाल्यामुळे बाल कल्याण समीती औरंगाबाद यांच्या आदेशाने शासनमान्य बालगृहात स्थलांतरीत करण्यात आले. उर्वरीत ०६ बालके (०३ मुले व ०३ मुली) ०१ एप्रिल २०२१ पासून संस्थेतच होती आणि ०१ बालिका दत्तकपुर्व संगोपणासाठी दत्तकेच्छुक पालकांनकडे होती.

## ०१ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२ या वर्षातील एकुण प्रवेशितांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रवेशाचा प्रवर्ग | मुले | मुली | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | ३१ मार्च २०२१ रोजी उपस्थित बालकांची संख्या | ०३ | ०३ | **०६** |
| १ | परीत्यागीत (Relinquish) | ०४ | ०५ | **०९** |
| २ | सापडलेले (Abandon) | ०१ | ०२ | **०३** |
| | **एकुण** | **०८** | **१०** | **१८** |

# दत्तक विधान प्रक्रिया सांख्यिकी

| मुले/ मुली | दत्तक विधान प्रकीया पूर्ण झालेली बालके | | दत्तक विधान प्रकीया चालू असलेली बालके | |
|---|---|---|---|---|
| | देशांतर्गत दत्तक विधान | देशाबाहेरील दत्तक विधान | देशांतर्गत दत्तकपूर्व संगोपनात पालकांना सुपूर्द | देशाबाहेरील दत्तक विधान प्रकीयेत |
| मुले | ०३ | ०० | ०० | ०१ |
| मुली | ०७ | ०० | ०० | ०० |
| **एकुण** | **१०** | | **०१** | |

३१ मार्च २०२२ एकुण १२ बालके प्रवेशित झाली. त्यापेकी ०९ बालके परित्यागीत होते. आणि ०३ बालके सापडलेली होती. आणि त्यापुर्वीची ०६ बालके, असे एकुण १८ बालके शिशुगृहात होती. यापैकी ०२ बालके (०१ मुलगा व ०१ मुलगी) विशेष काळजीची गरज असलेली आहेत. उर्वरीत १६ बालकां पैकी १० बालकांची दत्तक विधान प्रक्रिया कायदेशीररित्या पूर्ण झाली. उर्वरीत ०६ बालके आणि विशेष काळजीची गरज असलेली ०२ बालके दत्तक पालकांच्या प्रतिक्षेत आहेत.

साकार शिशुगृहात परीत्यागीत आणि सापडलेल्या बालकांव्यतीरीक्त अडचणीत सापडलेल्या नैसर्गिक पालकांची अपत्ये, ज्यांना काळजी व संरक्षणाची गरज आहे. अश्या बालकांचाही प्रवेश मा. बाल कल्याण समिती यांच्या आदेशाने होतो. अश्या तात्पुरत्या निवासासाठी प्रवेशित झालेल्या बालकांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

## तात्पुरत्या निवासासाठी प्रवेशित बालकांचा तपशील (CNCP)
### (१ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२)

| तपशील | मुल | मुली | एकुण |
|---|---|---|---|
| प्रवेशीत | ०३ | ०७ | १० |
| नैसर्गिक पालकांकडे सूपूर्त | ०२ | ०० | ०२ |
| जिल्हया बाहेर स्थलांतरीत | ०० | ०१ | ०१ |
| **एकुण** | **०५** | **०८** | **१३** |

या वर्षी देशांतर्गत १० दत्तक विधान प्रकीया पूर्ण झाल्या आहेत. ०१ बालिका व ०१ बालक अंतरदेशीय दत्तक विधान प्रक्रियेत आहेत. (यातील एक बालिका ०६ ते १८ वयोगटाच्या बालगृहातील आहे. ०६ ते १८ वयोगटातील बालगृहांना दत्तक विधान करण्याचे अधिकार नसल्याने त्या बालगृहातील बालकांना विशेष दत्तक संस्थेसोबत लिंक करुन या बालकांचे कायदेशिर दत्तक विधान विशेष दत्तक संस्थेमार्फत करण्यात येते.). सहा वर्ष पुर्ण झाल्यावर ०४ बालिकांना दुस-या बालगृहात स्थलांतरीत करण्यात आले व ०१ बालिका दुस-या जिल्हयातील असल्यामुळे बाल कल्याण समिती यांच्या आदेशाप्रमाणे दुस-या जिल्हयात स्थलांतरीत करण्यात आले.

# दत्तक अनुषंगिक सेवा

## १. दत्तकपूर्व सेवा - यामध्ये खालील सेवा समाविष्ट आहेत.

- दत्तकेच्छुक पालकांना बाळ दत्तक घेण्याविषयी आवश्यक सर्व माहिती देऊन संगणकीय ऑनलाईन नोंदणी करण्यासंदर्भात योग्य व आवश्यक मार्गदर्शन करणे.

- नोंदणीकृत दत्तकेच्छुक पालकांची नोंदणी झाल्यापासून ३० दिवसाच्या आत गृह भेट करुन, गृह भेटीदरम्यान कारा मार्गदर्शकतत्व, २०१७ नुसार समुपदेशन करुन, गृह अभ्यास अहवाल तयार करुन ऑनलाईन अपलोड करणे. असे गृहअभ्यास अहवाल करुन २०२१ - २०२२ या आर्थिक वर्षात एकुण १९ पालकांच्या गृहभेटी करुन जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांच्या सहया घेऊन काराच्या - केअरिंग्सवर अपलोड करण्यात आल्या.

- मा. न्यायालयात दत्तकासाठी याचिका दाखल करण्यापूर्वी, दत्तकेच्छुक पालकांची दत्तक समिती सोबत बैठक, दत्तक समितीने होकार दिल्यावर बालकाचा चाईल्ड स्टडी रिपोर्ट (Child Study Report) व मेडीकल अेक्शामीनेशन रिपोर्टवर (Medical Examiniation Report) सहया घेऊन बालकांची प्रत्यक्ष भेट.

- दत्तकपूर्व बालसंगोपनाचा करारनामा (Pre adoption Foster Care Agreement) करुन मा. जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद येथे कायदेशीर दत्तक विधान याचिका (Petition) दाखल करणे.

## २. दत्तक प्रकिये दरम्यानच्या सेवा -

- दत्तकेच्छूक पालकांना कायदेशीर दत्तक प्रक्रियेमध्ये मदत करणे.

- मा. जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद यांनी व्हेरीफिकेशनची तारीख दिल्याप्रमाणे पालकांना बाळासह मा. न्यायालयात हजर करुन व्हेरीफिकेशन करुन मा. न्यायालयाचे अंतिम आदेश करुन घेणे.

- दत्तक पालकांना न्यायालयीन आदेश मिळवून देणे.

## ३. न्यायालयीन आदेशानंतरच्या सेवा -

- दत्तक बालकाचे जन्म प्रमाणपत्र प्राप्त करुन दत्तक पालकांना देणे.

- विदेशी दत्तक विधान प्रक्रिया असल्यास कायदेशीर दत्तक विधान याचिका (Petition) दाखल करण्यापासून ते बालकाचे पासपोर्ट मिळेपर्यतची सर्व प्रक्रिया पूर्ण करणे. (यात विदेशी पालक भारतात येऊन दत्तक विधान प्रक्रिया पुर्ण करुन शकत नाहीत. म्हणून विदेशी पालक विशेष दत्तक संस्थेच्या समाजकार्यकर्त्याला जनरल पावर ऑफ ॲटोर्नी देतात. व या जनरल पावर ऑफ ॲटोर्नीच्या आधारावर संस्थेचा समाजकार्यकर्ता दत्तक विधान प्रक्रिया पुर्ण करतो.)

- न्यायालयात पालकांची याचिका (Petition) दाखल केल्याच्या तारखेपासून पुढील दोन वर्ष (प्रत्येक सहा महिन्याला एक) दत्तक पालकांची गृहभेट घेऊन बालकाचा प्रगती अहवाल (Follow up Report) ज्या संस्थेनी या पालकांचा गृह अभ्यास अहवाल केलेला आहे. त्या संस्थेला सादर करणे व ऑनलाईन अपडेट करणे. - २०२१ - २०२२ या वर्षात दत्तकविषयी न्यायालयीन एकुण २२ पालकांची गृहभेट घेऊन बालकांचा सद्यस्थीतीबाबत प्रगती अहवाल (Follow up Report) तयार करण्यात आला.

## ४. विशेष काळजीची गरज असलेल्या बालकाचे दत्तक विधाव्दारे पुनर्वसन -

आम्हाला या गोष्टीचा विशेष उल्लेख करावा वाटतो कारण या वर्षात झालेल्या दत्तक विधानामध्ये विशेष दत्तक विधान म्हणून आर्यमनच्या दत्तक विधानाचा उल्लेख करावा लागेल. आर्यमन आमच्याकडे आला तेव्हा तो खूप व्याधीग्रस्त होता. त्याचे यकृत काम करत नव्हते व तसेच यकृताला रक्त पुरवठा करणा-या वाहिन्या बंद होत्या. त्यामुळे आधी त्याचे तातडीने एक ऑपरेशन करणे गरजेचे होते. जे पुणे येथील के.ई.एम. हॉस्पीटललाच होऊ शकत होते. ते आम्ही केले. त्यात आमच्या हितचिंतक व देणगीदार यांनी सर्व प्रकारे सहाय केले. त्याबददल आम्ही सर्वांचे ऋणी आहोत. एवढयावरच थांबणार नव्हते तर त्याचे लिव्हर ट्रान्सप्लान्ट होणक जरुरी होते. परतु त्याचे ठराविक वजन वाढत्याशिवाय ते करणे शक्य नव्हते. मात्र त्याची आर्थिक जुळवाजुळव करण्याच्या आम्ही तयारीत असतांनाच, त्याला अमेरीकेतील एक तरुण दाम्पत्याने दत्तक घेण्याचे ठरविले. त्यानंतर त्याचे कायदेशीर दत्तक विधान झाल्यावर अमेरीकेत या दत्तक पालकांनी त्याचे लिव्हर ट्रान्सप्लान्ट केले. आता आर्यमन त्यांच्या कुटुंबात चांगले जीवन जगत आहे.

# दत्तक संकल्पना - प्रचार व प्रसार

दत्तकाच्या कार्यात दत्तक संकल्पनेचा प्रचार व प्रसार करणे याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. समाजातील सर्व स्तरापर्यंत दत्तकाचे प्रचार कार्य अव्याहतपणे चालू ठेवण्याची निकड असली तरी आणि त्याप्रमाणे ते कार्य साकार संस्थेमार्फत होत असले तरीही, बाल दिनापासून पुढे एक आठवडा 'दत्तक जाणीव जागृती सप्ताह' म्हणून दर वर्षी साजरा केला जातो. यावर्षी करोना चा संसर्ग होऊ नये, म्हणून नियमांचे काटेकोरपणे पालन करून दत्तक जाणीव-जागृती सप्ताहांतर्गत विविध कार्यक्रमांद्वारे, सामाजिक योगदान प्राप्त झाले.

| दिनांक व वेळ | कार्यक्रमाचा तपशिल | स्थळ |
|---|---|---|
| **१४ नोव्हेंबर २०२१, दुपारी १२ वाजता** | **दत्तक जाणीव जागृति सप्ताहाचा उदघाटन समारोह** डॉ. आनंद नाडकर्णी, प्रसिध्द मनोविकार तज्ञ. | साकार संस्थेचे कार्यालय, ज्योतीनगर, औरंगाबाद |
| **१५ नोव्हेंबर २०२१, सकाळी ०९.३० वाजता** | कर्मचारी यांची शुगर व हिमोग्लोबीन तपासणी व आया व स्टाफ यांची आरोग्य तपासणी डॉ. प्राची पटेल | साकार संस्थेचे कार्यालय, ज्योतीनगर, औरंगाबाद |
| **१६ नोव्हेंबर २०२१,** | हितचिंतक व देणगीदार भेटी (सकाळी १०.३० ते ५.०० पर्यंत) | साकार संस्थेचे कार्यालय, ज्योतीनगर, औरंगाबा |
| **१७ नोव्हेंबर २०२१, सकाळी ११.०० वाजता** | बालगृहातील १० ते १८ वयोगटातील बालिकांसाठी क्षितिज कार्यक्रम | भगवान बाबा बालिकाश्रम, सातारा परिसर |
| **१८ नोव्हेंबर २०२१, सकाळी ११.०० वाजता** | बालकांसाठी आरोग्य शिबीर आयोजित करणे<br>अंगणवाडी सेविका यांच्या मदतीने बालकांच्या विकासाचा, आहाराचा, वाढीचा तक्ता तयार करणे.<br>१. अंगणवाडी सेविका, सातारा परिसर सौ. सुनिता सावंत<br>२. अंगणवाडी सेविका, सातारा परिसर सौ. निता चांदे | साकार संस्थेचे कार्यालय, ज्योतीनगर, औरंगाबाद |
| **दुपारी ४.३० वाजता** | मा. बाल कल्याण समिती सदस्यास्यांची कार्यालयीन भेट | साकार संस्थेचे कार्यालय, ज्योतीनगर, औरंगाबाद |
| **१९ नोव्हेंबर २०२१, सकाळी ११.०० वाजता** | मॅन ऐनर्जी सोल्युशन इंडिया प्रा. लि. , वाळुज, औरंगाबाद यांची सदिच्छा भेट | साकार संस्थेचे कार्यालय, ज्योतीनगर, औरंगाबाद |
| **२० नोव्हेंबर २०२१,** | **दत्तक जाणीव जागृति सप्ताहाचा समारोप**<br>१. **मा. ॲड. मनोहर बन्सवाल**, प्रभारी अध्यक्ष, बाल कल्याण समिती, औरंगाबाद<br>२. **मा. ॲड. अनिता शिऊरकर**, सदस्य, बाल कल्याण समिती, औरंगाबाद<br>३. **मा. प्रा. अश्विनी लखमले**, सदस्य, बाल कल्याण समिती, औरंगाबाद<br>४. **मा. श्री. महादेव डोंगरे**, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, औरंगाबाद. | साकार संस्थेचे कार्यालय, ज्योतीनगर, औरंगाबाद |

# प्रसिध्द मनोविकार तज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या उपस्थितीत दत्तक जाणीव जागृती सप्ताहाचे उद्घाटन

दि. १४ नोव्हेंबर २०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता साकार संस्थेच्या ज्योतीनगर, औरंगाबाद येथील कार्यालयात प्रसिध्द मनोविकार तज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांनी साकार संस्थेस सदिच्छा भेट देऊन दत्तक जाणीव जागृती सप्ताहाचे उद्घाटन केले.

यावेळेस डॉ. आनंद नाडकर्णी साकार संस्थेमध्ये आपल्या पत्नीसह डॉ. सौ. सविता नाडकर्णी साकार संस्थेचे कामकाज जाणून घेण्यास आवर्जून आले होते.

संस्थेत आल्यानंतर दोघांनीही शिशु गृहास भेट दिली व मोठ्या मुलीसोबत संवाद साधला. यावेळेस साकार संस्थेच्या कामकाजाविषयी व किती बाळ आतापर्यंत दत्तक दिली आहेत याची माहिती संस्थेच्या अध्यक्ष डॉ. सविता पानट यांनी दिली. साकार संस्थेचे कामकाज व स्वच्छता बघून त्यांनी समाधान व्यक्त केले. साकार संस्थेच्या अध्यक्ष डॉ. सविता पानट यांनी श्री. व सौ. नाडकर्णी याचा स्मृती चिन्ह, शाल व रोपटे देऊन सत्कार केला.

यावेळेस साकार संस्थेचे सर्व पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



डॉ. सविता पानट पाहुण्यांचा परिचय करुन देतांना व साकारची माहिती सांगतांना.


शिशु गृहातील बाळांना आस्थेवाईकपणे बघतांना श्री. व सौ. नाडकर्णी





श्री. व सौ. नाडकर्णी यांच्या सोबत साकारचे पदाधिकारी व कर्मचारी वर्ग

# संस्थेतील कर्मचा-यांची आरोग्य तपासणी

दि. १५/११/२०२१ रोजी दरवर्षीप्रमाणे संस्थेत काम करणा-या कर्मचा-यांची शुगर, हिमोग्लोबीन तपासणी करण्यात आली व डॉ. प्राची पटेल यांच्याकडुन आयांची आरोग्य तपासणी करुन त्यांना आरोग्य वृधीसाठी सूचना देण्यात आल्या.

यावेळेस डॉ. प्राची पटेल यांनी सर्व आयांना आरोग्याची काळजी कशी घ्यायची व रोज व्यायाम करणे आरोग्यासाठी व आपल्या कुटुंबासाठी किती महत्वाचे आहे हे समजावून सांगितले. कारण बाळाचे आरोग्य आपल्याच आरोग्यावर निर्भर असते. त्यामुळे आपल्या आरोग्याची काळजी घेणे हे अतिशय महत्वाचे आहे.




डॉ. प्राची पटेल आयांची अरोग्य तपासणी करतांना




आयांची शुगर व हिमोग्लोबीनची तपासणी करतांना लॅब टेक्नीशीयन श्री. मिर्झा

# संस्थेचे हितचिंतक व देणगीदार यांच्या दत्तक जाणीव जागृती सप्ताहानिमित्त भेटी

साकार संस्थेचे देणगीदार व हितचिंतक यांच्या सदिच्छाभेटीसाठी दत्तक जाणीव जागृती सप्ताहात, विशेष आवाहन करण्यात येते कि आपण संस्थेस भेट देवून दत्तक जाणीव जागृती सप्ताहात सहभागी व्हावे. संस्थेच्या या आवाहनास मान देऊन देणगीदार व हितचिंतक यांनी आवर्जून संस्थेस भेट देऊन दत्तक जाणीव जागृती सप्ताहाचा उददे्श व त्याचे महत्व जाणून घेतले. काही निवडक देणगीदार खालीलप्रमाणे आहेत.




सौ. वर्षा पिंपळे, डॉ. हेडगेवार रुग्णालय, औरंगाबाद




सन्माननीय देणगीदर डॉ. संगिता शिंदे, कामगार कल्याण हॉस्पीटल, औरंगाबाद

# बालगृहातील बालकांसाठी कुटुंब जीवन शिक्षण कार्यक्रम

दि. १७/११/२०२१ रोजी भगवानबाबा बालिकाश्रम, सातारा परिसर, औरंगाबाद येथे १० ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुलींसाठी **"क्षितीज"** प्रकल्पाअंतर्गत **"कुटुंब जीवन शिक्षण"** कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम आयोजित करण्यामागील मुख्य उददेश **"लैंगिकता शिक्षण अवखळ वयातील"** मुलींना देणे हा होता, जेणे करुन त्यांना या कालावधीतील वाटचाल करतानाचे धोके लक्षात येतील. या कार्यक्रमात काही मुलींनी अनुभव व्यक्त केले.




मुलींना मार्गदर्शन करतांना वैशाली अवलगावकर




भगवानबाबा बालिकाश्रम येथील बालिका आपले अनुभव सांगतांना




भगवानबाबा बालिकाश्रम येथील बालिकां समवेत साकार संस्थेच्या कायदे सल्लागार ॲड. अर्चना गोधळेकर आणि सदस्य वैशाली अवलगावकर

# अंगणवाडी सेविकांच्या मार्गदर्शना अतंर्गत शिशु गृहातील बालकांचा विकास वाढीचा तक्ता

दि. १८/११/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता अंगणवाडी सेविका यांच्या सहकार्याने शिशु गृहातील बालकांच्या विकास वाढीचा तक्ता तयार करण्यात आला. यावेळी अंगणवाडी सेविका यांनी बालकांची उंची, वजन घेऊन साकारच्या परिचारीका व समाजकार्यकर्ती यांच्या सोबत चर्चा केली व बालकांचे वयोमानानुसार किती वजन पाहिजे हे अतिशय चांगल्याप्रकारे आयांना समजावून सांगितले. त्याचबरोबर वयानुसार आवश्यक त्या आहाराविषयी मार्गदर्शन केले.

यासाठी सातारा परीसरातील अंगणवाडी सेविका सुनिता सावंत व निता चांदे याचे सहकार्य लाभले. याप्रसंगी साकारच्या सचिव व कर्मचारी उपस्थित होते.




बालकांचा विकास वाढीचा तक्ता समजावून सांगतांना अंगणवाडी सेविका निता चांदे व सुनिता सावंत




बालकांचे वजन व उंची घेतांना अंगणवाडी सेविका निता चांदे




अंगणवाडी सेविका सुनिता सावंत व निता चांदे यांचा सत्कार करतांना साकार संस्थेच्या सचिव सुचित्रा देशपांडे, सोबत कर्मचारी वर्ग

# बाल कल्याण समितीची साकार संस्थेस भेट

दि. १८/११/२०२१ रोजी दुपारी ४.३० वाजता औरंगाबाद बाल कल्याण समिती सदस्य मा. अश्विनी लखमले, आनिता शिऊरकर व औरंगाबाद बाल कल्याण समितीचे प्रभारी अध्यक्ष मा. डॉ. मनोहर बसंवाल यांनी साकार संस्थेस भेट दिली. यावेळी दत्तक जाणी जागृती सप्ताहात झालेल्या व होणा-या विविध कार्यक्रमांची माहिती सांगितली.




**बाल कल्याण समिती सदस्य मा. अश्विनी लखमले व साकारचे विजय मगरे व राखी भोसले**

# मॅन एनर्जी सोल्युशन इंडिया प्रा. लि., वाळुज, औरंगाबाद यांची साकार संस्थेस सदिच्छा भेट

दि. १९/११/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता मॅन एनर्जी सोल्युशन इंडिया प्रा. लि. , वाळुज, औरंगाबाद येथील वरीष्ठ अधिकारी श्री. रवीश एम.के. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. अरुण सिंग, एच.आर.हेड, व त्यांचे सहकारी श्री. मंगेश ऋषी पाठक निलेश विटेकर, कंपनी सचिव, यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांना साकारच्या कामकाजाबददल माहिती सांगितली व पुर्ण भारतातील विशेष दत्तक संस्था १४ नोव्हेंबर ते २१ नोव्हेबर या दरम्यान दत्तक जाणीव जागृती सप्ताह का साजरा करतात याची माहिती सांगितली. तसेच संस्थेतील बालकांच्या प्रवेशापासून बालकांचा दत्तकेच्छू कुटुंबात कायदेशीर दत्तक विधान होईपर्यंतची प्रक्रिया त्यांना विशद केली. यावेळी दत्तकाच्या अनुषंगाने विविध पैलुवर चर्चा झाली. यावेळेस त्यांनी शिशु गृहास भेट दिली व शिशु गृहातील सुविधाबददल समाधान व्यक्त केले. कंपनीच्या सामाजिक दायित्व योजने अंतर्गत संस्थेस निधी प्राप्त झालेला आहे. त्या बदद्ल हार्दिक आभार.




**मॅन एनर्जी सोल्युशन इंडिया प्रा. लि.चे वरिष्ठ अधिकारी व त्यांच्या सोबत चर्चा करतांना साकारचे पदाधीकारी**

# दत्तक जाणीव जागृति सप्ताहाचा समारोप समारंभ

दि. २०/११/२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता दत्तक जाणीव जागृती सप्ताहाचा समारोप समारंभ साकार संस्थेच्या ज्योतीनगर येथील कार्यालयात आयोजीत करण्यात आला होता.

महिला व बालविकास विभाग अंतर्गत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बाल कल्याण समिती, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, औरंगाबाद आणि साकार संस्था आयोजित दत्तक जाणीव जागृती सप्ताहाचा समारोप समारंभ साकार संस्थेच्या प्रांगणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ.सविता पानट होत्या तर प्रमुख अतिथी बाल कल्याण समिती चे प्रभारी अध्यक्ष ॲड. डॉ. मनोहर बसंवाल होते. विशेष अतिथी म्हणून, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी महादेव डोंगरे, आणि बाल कल्याण समिती सदस्या ॲड. अनिता शिऊरकर, प्रा. अश्विनी लखमले होत्या. तर परिविक्षा अधिकारी विजय विघ्ने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नीलिमा पांडे उपाध्यक्ष साकार संस्था, यांनी केले. तर सूत्रसंचालन साकारच्या सदस्या माधुरी शब्दे यांनी केले सुरवातीलाच साकार संस्थेतील आया, नर्स, डॉक्टर, कर्मचारी व साकारच्या सदस्यांना कोविड योद्धा म्हणून गौरविण्यात आले. नव्याने सुरू झालेल्या मोठ्या बालकांच्या दत्तकाचे महाराष्ट्रात सर्वप्रथम कार्य साकार संस्थेने दत्तक जाणीव जागृती सप्ताहाच्या पूर्व संध्येला केले याबद्दल डॉ. मनोहर बन्सवाल सर यांनी कौतुक केले.

कार्यक्रमाचे विशेष अतिथी महादेव डोंगरे यांनी मोठ्या बालकांच्या दत्तक प्रक्रिये मध्ये घ्यावयाची काळजी यावर भर दिला. अश्विनी लखमाले यांनी बाल कल्याण समितीच्या कामकाजातून बालकांचं कल्याण साधताना समाधान तर लाभलेच व खूप काही शिकण्यास मिळाले असे सांगितले. अनिता शिऊरकर मॅडम यांनी दत्तक कार्या विषयी चा संदेश समाजात सर्व लोकांपर्यंत पोहोचावा यावर आपल्या भाषणात भर दिला.

परीविक्षा अधिकारी विजय विघ्ने सरांनी दत्तक प्रक्रियेतील प्रशासकीय बाबींची पूर्तता चोखपणे व्हावी असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी साकारच्या अध्यक्षा सविता पानट यांनी दत्तक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शासकीय व आरोग्य विभागातील यत्रणे चा कोरोना काळातील सहभाग उल्लेखनीय असल्याचे सांगितले. दत्तक जाणीव जागृती सप्ताहात साकार संस्थेत दत्तक प्रक्रियेतील विविध घटकांशी निगडित कार्यक्रम घेण्यात आले व दत्तक प्रक्रियेतील विविध पैलूंची चर्चा घडविण्यात आली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन साकार संस्थेच्या कायदे सल्लागार ॲड. अर्चना गोंधळेकर यांनी केले. या कार्यक्रमात साकारच्या बालरोगतज्ञ डॉ. रोशनी सोधी, डॉ. प्राची पटेल, जिल्हा बाल संरक्षण कक्षचे समाजकार्यकर्ते श्री. दिपक बाजारे, जिल्हा बाल संरक्षण कक्षच्या संरक्षण अधिकारी कल्पना मोहिते, जिल्हा बाल संरक्षण कक्षच्या कायदा व परिवीक्षा अधिकारी सुप्रिया इंगळे, चाईल्ड लाईनच्या कार्यक्रम व्यस्थापक अन्नपूर्णा, घाटी हॉस्पिटलच्या समाजकार्यकर्त्या अनुसया, वेअर आर इंडिया चिल्ड्रेन्स चे संजय शेट्टी आवर्जून उपस्थित होते.

या समारंभास  साकार संस्थेचे पदाधिकारी, आया, कर्मचारी, हितचिंतक, देणगीदार, व दत्तक पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**दत्तक जाणीव जागृती सप्ताह समारोप छायाचित्रे**



व्यासपीठावर मान्यवर



दिप प्रज्वलन करतांना मा. मनोहर बसंवाल व इतर मान्यवर



मार्गदर्शन करतांना बा.क.स.प्र. अध्यक्ष मा. मनोहर बसंवाल



मार्गदर्शन करतांना जि.बा.सं.अ. मा.महादेव डोगरे



सर्व मान्यवर

# ● सामाजिक दायित्व (CSR) अतंर्गत साकारला मदत ●

## औरंगाबाद इलेक्ट्रीकल्स प्रायव्हेट लिमिटेड, औरंगाबाद

औरंगाबाद शहरातील नामांकित कंपनी औरंगाबाद इलेक्ट्रीकल्स प्रा. लि., औरंगाबाद येथील वरिष्ठ अधिका-यांनी साकार संस्थेस सदिच्छा भेट देऊन संस्थेच्या शिशु गृहाच्या कामकाजाविषयी माहिती घेतली व साकारचे कामकाज बघून समाधान व्यक्त केले. आणि शिशु गृहातील सुविधांसाठी आर्थिक सहाय करण्याविषयी शिफारस केली. औरंगाबाद इलेक्ट्रीकल्स प्रा. लि., कंपनी तर्फे साकार CSR अंतर्गत तीन वर्षासाठी (२०२० ) निधी मंजुर करण्यात आला.

## मॅन ऐनर्जी सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड, औरंगाबाद

औरंगाबाद शहरातील नामाकित कंपनी मॅन ऐनर्जी सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड, वाळुज, औरंगाबाद, येथील वरिष्ठ अधिकारी यांनी संस्थेस सदिच्छा भेट देऊन संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त करत सलग तिस-या वर्षीही (२०२१-२०२२), साकार संस्थेस CSR अंतर्गत भरीव आर्थिक मदत केली व भविष्यातही आम्हाला जमेल तशी मदत आम्ही साकारच्या बाळासाठी करु असे आश्वासन दिले.




मॅन ऐनर्जी सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड, वाळुज, औरंगाबाद, येथील वरिष्ठ अधिकारी यांनी साकार संस्थेस सदिच्छा भेट दिली. त्यांच्या सोबत साकार संस्थेचे पदाधिकारी

# संस्था तपासणी भेटी

| अ.क्र. | दिनांक | भेट देणा-या अधिका-यांचे नाव, पद व विभाग |
|---|---|---|
| १ | २५/०५/२०२१ | १. परिविक्षा अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, औरंगाबाद.<br>२. श्री. व्ही. बी. विघ्ने, परिविक्षा अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, औरंगाबाद.<br>३. श्री. महादेव डोगरे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, औरंगाबाद |
| २ | ०८/०७/२०२१ | १. डॉ. एन.जी.पवार, जिल्हा परिविक्षा, अनुरक्षण गृह, पदमपुरा, औरंगाबाद.<br>२. जि.अ.भा. अधिकारी, औरंगाबाद.<br>३. ॲड. विवेक कुलकर्णी, सदस्य, बाल न्याय मंडळ, औरंगाबाद<br>४. डॉ. भारत कदम, उपजिल्हाधिकारी (निवडणुक), औरंगाबाद.<br>४. श्री. पुगळे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, औरंगाबाद.<br>५. ॲड. अनिता शिऊरकर, सदस्य, बाल कल्याण समिती, औरंगाबाद. |
| ३ | २४/०९/२०२१ | १. श्री. बी. एल. राठोड, जिल्हा परिविक्षा अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, औरंगाबाद.<br>२. श्री. महादेव डोगरे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, औरंगाबाद |
| ४ | १८/११/२०२१ | १. ॲड. मनोहर बन्सवाल, सदस्य, बाल कल्याण समिती, औरंगाबाद.<br>२. ॲड. अनिता शिऊरकर, सदस्य, बाल कल्याण समिती, औरंगाबाद.<br>३. प्रा. अश्विनी लखमले, सदस्य, बाल कल्याण समिती, औरंगाबाद. |
| ५ | २९/११/२०२१ | १. श्री. व्ही. बी. विघ्ने, परिविक्षा अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, औरंगाबाद.<br>२. श्री. महादेव डोगरे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, औरंगाबाद<br>३. श्री. दिपक बजारे, सामाजीक कार्यकर्ता, बाल संरक्षण, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, औरंगाबाद |
| ६ | १८/०२/२०२२ | १. ॲड. मनोहर बन्सवाल, सदस्य, बाल कल्याण समिती, औरंगाबाद.<br>२. ॲड. अनिता शिऊरकर, सदस्य, बाल कल्याण समिती, औरंगाबाद.<br>३. प्रा. अश्विनी लखमले, सदस्य, बाल कल्याण समिती, औरंगाबाद. |
| ७ | १५/०३/२०२२ | १. सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद.<br>२. ॲड. विवेक कुलकर्णी, सदस्य, बाल न्याय मंडळ, औरंगाबाद<br>३. ॲड. मनोहर बन्सवाल, सदस्य, बाल कल्याण समिती, औरंगाबाद.<br>४. डॉ. एन.जी.पवार, जिल्हा परिविक्षा, अनुरक्षण गृह, पदमपुरा, औरंगाबाद.<br>५. श्री. व्ही. बी. विघ्ने, परिविक्षा अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, औरंगाबाद. |

२०२१ - २०२२ या साली शासनाचे अधिकारी, कर्मचारी, जिल्हा तपासणी पथकाच्या भेटी साकार संस्थेस झाल्या, यावेळी त्यांनी पाहणी करुन, साकारची स्वच्छता व कामाची प्रशसा केली.

# विविध उपक्रम

करोना काळात संस्थेत विविध कार्यक्रम आयोजित करण्यास मर्यादा असल्या तरी विविध नियमित उपक्रमांचे आयोजन बालकांच्या आरोग्याची काळजी घेऊनच केले गेले. संपूर्ण वर्षभरातील कार्यक्रमांची माहिती खालील प्रमाणे दिली आहे.

# नियमित उपक्रम

## १. जागतिक मातृदिन -

जागतिक मातृदिन - दरवर्षीप्रमाणेच यंदाही मे 2021 रोजी, साकार संस्थेत साजरा केला गेला. साकार शिशू गृहातील बाळांसाठी, 'आया' हीच 'बालकांची माता' असल्याने, तिची विशेष "जबाबदारी आणि कर्तव्य" याविषयी संस्थेच्या अध्यक्ष सविता पानट यांनी सर्व आयांना मार्गदर्शन केले. विशेषतः करोना काळात, आयांना वैयक्तिक स्वच्छता व आहार याबाबत जागृत राहण्याविषयी सांगून, बालकांची स्वच्छता, शिशु गृहाची स्वच्छता आणि बालकांचे सुदृढ आरोग्य, याला अग्रक्रम देण्याविषयी त्यांनी त्यांच्या मार्गदर्शनात भर दिला. कार्यक्रमाच्या शेवटी आयांच्या अविरत आणि निस्पृह सेवेबद्दल, त्यांना भेटवस्तू देऊन प्रोत्साहित करण्यात आले.

## २. जागतिक योग दिवस

दि. २१ जुन २०२१ रोजी जागतिक योगदिनाचे औचित्य साधून साकार परिवारासाठी योग शिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला होता. प्रमुख पाहुणे व योगा प्रशिक्षक म्हणून संजना नानीवडेकर या उपस्थित होत्या. यावेळी संजना नानीवडेकर यांनी ०३ तासाच्या वेळात १० योगासने करुन दाखवली व उपस्थितांकडून आणि आयाकडून प्रात्याक्षिक करुन घेतले. तसेच त्यांनी मुद्रा, साधना, श्वसन, प्राणायाम व ध्यान यांचे महत्व सर्वांना समजावून सांगितले. आणि योगामुळे संयम आणि शांती प्राप्त होते असे त्यांनी सांगितले.

साकारच्या उपाध्यक्षा, सचिव व कोषाध्यक्ष यांनी योगादिवस साजरा करण्यामागील उददेश समजावून सांगितला. तसेच सध्याचा कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव बघता योगामुळे आपल्याला किती फायदे होऊ शकतात व एखादे काम करतांना हवा असलेला आत्मविश्वास मिळविण्यात योगाची कशाप्रकारे मदत होते हे सांगितले.

## ३. जन्माष्टमी/श्रीकृष्ण जयंती

दत्तकाचे द्योतक मानल्या जाणा-या श्रीकृष्णाची जयंती म्हणजेच जन्माष्टमी कार्यक्रम होय. साकार संस्थेत नियमितपणे या दिवशी हा कार्यक्रम साजरा केला जातो. या वर्षी मात्र कार्यक्रमाचे स्वरुप छोटेखानी होते. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी श्रीकृष्ण जयंतीचा कार्यक्रम दि. ३० ऑगस्ट २०२१ रोजी साकार संस्थेच्या कार्यालयात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेतील बालगोपालांना राधा - कृष्णाचा साज घालण्यात आला होता.

कार्यक्रमास संस्थेतील कर्मचारी व आया उपस्थित होत्या आणि ऑनलाईन पध्दतीने संस्थेच्या सचिव, कोषाध्यक्ष व सर्व सदस्य या कार्यक्रमास हजर होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेतील बालगोपालांच्या हस्ते दहिहंडी फोडण्यात आली.

# ४. महिला दिन

दि. ८ मार्च २०२२ रोजी साकार संस्थेत जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या वेळी ''जबाबदार पालकत्व'' या विषयावर प्रसिध्द मानसोपचार तज्ञ मा. मधुरा अन्विकर यांचे मार्गदर्शन आयोजित केले होते. या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्ष होत्या. कार्यक्रमासाठी आपण विषेतः ज्या पालकांनी बाळ दत्तक घेतलेली आहेत व वयानी थोडी माठी झाली आहेत अश्या निवडक दत्तक पालकांना आवर्जून बोलावले होते. यावेळेस मधुरा अन्विकर यांनी बालकांमध्ये ते जस - जसे मोठे होतात, तस - तसे त्यांच्यात कसे बदद्ल होतात, ते होणारे बदद्ल यावर आपण कसे काम करावे हे पालकांना समजावून सांगितले. मॅडम ज्यावेळेस सांगत होत्या त्यावेळेस पालकांनी असे मत व्यक्त केले की, खरच आम्हाला ब-याच गोष्टी माहिती नव्हत्या त्या आम्हाला साकारमुळे माहिती झाल्या. या बाबत कार्यक्रमाच्या अध्यक्षा यांनी पालकांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास कार्यकारी मंडळ, आया, कर्मचारी व दत्तक पालक उपस्थित होते. यावेळेस सगल्या मान्यवरांनी सर्व आयांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.




प्रसिध्द मानसोपचार तज्ञ मा. मधुरा अन्विकर यांचे साकारचे स्मृती चिन्ह देऊन सत्कार करतांना संस्थेच्या अध्यक्ष ॲड. अर्चना गोधळेकर त्यांच्या समवेत डॉ. सविता पानट




मार्गदर्शन करतांना मानसोपचार तज्ञ मा. मधुरा अन्विकर



मार्गदर्शक, प्रसिध्द मानसोपचार तज्ञ मा. मधुरा अन्विकर यांचे मार्गदर्शन मनलावून ऐकतांना दत्तक पालक, संस्थेचे कार्यकारी सदस्य, कर्मचारी व आया

# ५. संस्थेतील बालकांसाठी सहल

दि. १९ मार्च २०२२ रोजी साकार संस्थेतील ०२ ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना औरंगाबाद शहरातील पल्लवांकुर नर्सरी येथे सहलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पल्लवांकुर नर्सरी या ठिकाणी बालकांनी विविध प्रकारची झाडे बघीतली. व तेथे मुलांसाठी खेळण्याचे विविध प्रकारची खेळणी होती. त्या खेळण्याचा आनंद मुलांनी चांगल्या प्रकारे घेतला. मोकळया, नैसर्गिक वातावरणात स्वच्छंदपणे बागडल्यानंतर संस्थेनेच सोबत दिलेल्या चवदार पदार्थांचा येथेच्छ आस्वाद सर्व बाल गोपालांनी घेतला. सहलीवरुन परततांना त्यांच्या चेह-यावर सहलीचा आनंद खुलुन दिसत होता.







पल्लवांनकुर नर्सरी येथे सहलीचा आनंद घेतांना संस्थेतील बाळ गोपाळ

# विशेष उपक्रम

## १. आयां साठी 'बाळांची काळजी व संगोपन' यावर कार्यशाळा

साकारच्या बालरोग तज्ञ डॉ. रोशनी सोधी व डॉ. प्राची पटेल यांनी कोरोना चा वाढता प्रभाव बघता, तसेच बाळांना सांभाळताना आयांनी व इतर कर्मचार्यांनी घ्यावयाची काळजी यावर कार्यशाळा घेतली. ज्यात त्यांनी खालील गोष्टींबद्दल सविस्तर तसेच प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले.

1) बाळांची काळजी घेताना लक्षात ठेवायच्या गोष्टी जसे तापमान, बाळाची मसाज, ऋतूनुसार बाळांना गुंडाळणे, बाळांची अंघोळ तसेच पाळण्यात बाळांची घ्यावयाची काळजी.
2) बाळांच्या प्राथमिक तपासण्या जसे की तापमान, श्वास, कलर, उंची, वजन, डोक्याचा घेर इ.
3) बाळांचे चार्ट तयार करणे व अद्यावत ठेवणे.
4) बाळांची स्वच्छता
5) आपत्कालीन स्थितीत घ्यावयाची काळजी
6) बाळांची होणारी वाढ

तसेच सदरील कार्यशाळा ही दर 2-3 महिन्याच्या अंतराने पुन्हा घेण्याचे आवाहन त्यांनी केले त्यानुसार साकारच्या कर्मचार्यांनी डॉ. रोशनी सोधी व डॉ. प्राची पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली पुन्हा कार्यशाळा आयोजित केली.










साकार संस्थेच्या प्रसिध्द बालरागतज्ञ डॉ. रोशनी सोधी व डॉ. प्राची पटेल संस्थेतील

# २. आगळ्या वेगळ्या पद्धतीचा व्हॅलेंटाईन डे

जगभरात व्हॅलेंटाईन डे हा प्रेमाचा दिवस म्हणून साजरा केला जातो. प्रेमाचे प्रगटीकरण वेगवेगळ्या पद्धतीने होत असते पण सर्वांना अभिप्रेत असलेला प्रेमाचा आशय म्हणजेजिव्हाळा, आपुलकी, काळजी, त्याग की ज्याद्वारे व्यक्ती सुखावते. प्रेम हे सर्व सांसारिक आनंद सुख, तृप्ती आणि समृद्धीचे सार आहे.जगाने प्रेमाच्याअनेक व्याख्या त्यांच्या पद्धतीनुसार केल्या आहेत.

या वर्षी जग आनंदानेप्रेमाचा उत्सव साजरा करत असताना, औरंगाबादच्याएमआयटी महाविद्यालयातील इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंगच्या विभागप्रमुख, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी सुरु केलेल्या उपक्रमासाठीसाठी साकार संस्थेशीसंपर्क साधलाआणि "ऋणानुबंध" नावाच्या कार्यक्रमाद्वारे समाजाप्रती सामाजिक उत्तरदायित्वाची नवीन शिकवण एका अनोख्या पद्धतीने मांडली ज्याला साकार पदाधिकाऱ्यांनी आनंदाने स्वीकारले.

बालकल्याण क्षेत्रातील अग्रगण्य संस्था म्हणूनसाकार हीविशेष दत्तक संस्था म्हणून ओळखली जातेदत्तकाद्वारे काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या मुलांचे पुनर्वसन करण्याचे कार्य गेली27 वर्षांहून अधिक वर्षेसमाजात सेवा देत आहे.

साकार ने समाजाप्रती देऊ केलेले हे योगदान एक प्रेमाचे प्रतीक च म्हणावे लागेल हे जाणून च, साकारच्या प्रांगणात औरंगाबादच्या एमआयटी कॉलेज विभाग प्रमुख आणि प्राध्यापक आणि विध्यार्थी यांनी व्हॅलेंटाईन डे च्या साजरीकरणासाठीसंस्थेस भेट दिली.या प्रसंगी कार्यक्रमाच्या सुरुवातीस साकार संस्थेचे कार्यकारी सचिव श्री. सुहास वैद्य यांनी साकार संस्थेचा परिचय करून दिला आणि दत्तक विधानाबद्दल माहिती दिली. त्या नंतर विभागप्रमुखडॉ. एस. एम. बडवेयांनी "ऋणानुबंध" या उपक्रमाबद्दल सविस्तर माहिती दिलीत्याच बरोबर व्हॅलेंटाईन डे म्हणजेच गुलाबाची देवाणघेवाण करणे आणि प्रेम व्यक्त करणे नव्हे तर गरजूंसाठी काहीतरी करणे हा व्हॅलेंटाईन डे साजरा करण्याचाआणि प्रेम व्यक्त करण्याचा एक मार्ग आहे. कार्यक्रमाच्या शेवटीसाकारच्या अध्यक्षाॲड.अर्चना गोंधळेकर म्हणाल्या की, एका उदात्त हेतूसाठी विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी दिलेल्या योगदानाबद्दल मी आनंदी आणि आभारी आहेआणिअशा प्रकारचे उपक्रम हे तरुणांना आदर्श देणारेच आहेत याचा सर्वदूर महाविद्यालयीन युवक आणि युवतींमध्ये प्रसार व्हावा आणि त्यांनी यातून प्रेरणा घ्यावी अशा प्रकारचे उद्गार त्यांनी व्यक्त केले..

या दिनाचे औचीत्य साधून व्हॅलेंटाईन डे एका आगळ्या वेगळ्या पद्धतीनेएमआयटीच्या सर्व टीमनेसाजरा केला त्यावेळी साकारच्या मुलांसाठी लॅक्टोजेन आणि अन्य व शैक्षणिक साहित्य व अत्यंत आवश्यक गोष्टी दान केल्या. एका उदात्त कारणासाठी व्हॅलेंटाईन डे साजरा केल्याने प्रत्येकाला खूप आनंद झालाआणि प्रश्नोत्तरांच्या सत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.या प्रसंगी साकारच्या उपस्थीत पदाधिकाऱ्यांनी सर्व प्रश्नांची माहितीपूर्ण आणि संवादात्मक उत्तरे दिली.एमआयटी कॉलेज औरंगाबादच्या इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग विभागाचेविभागप्रमुख, प्राध्यापकांनीआणि सर्व विध्यार्थ्यांनी आणि हे उदात्त कार्य पुढेही सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आणि एकमेकांना एका वेगळ्या आणि उदात्त "ऋणानुबंधा" मध्ये बांधले.




**विद्यार्थ्यांना साकार संस्थेचे माहिती व कामकाजाबददल एम.आय.टी. कॉलेजच्या विद्यार्थ्यांना माहिती देतांना संस्थेच्या अध्यक्ष ॲड. अर्चना गोंधळेकर व व्यासपीठावर एम.आय.टी. कॉलेजचे प्राध्यापक व समोर संस्थचे कार्यकारी सदस्य व दुस-या छायाचित्रात विद्याथी, एम.आय.टी. कॉलेजचे प्राध्यापक व साकार संस्थेचे पदाधिकारी**

## ३. शिव जयंती निमित्त जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय यांची संस्था भेट व संस्थेला मदत

शिवजयंती निमित्त जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय अधिकारी व कर्मचारी यांनी या दिनी साकार संस्थेला भेट दिली तसेच संस्थेला गरजेचे असे ड्रायर त्यांनी भेट दिले. श्रीमती चौधरी, श्रीमती नाटकर, श्रीमती घाटगे इ. अधिकारी व कर्मचारी हजर होते. सदरील कार्यक्रमास साकार तर्फे साकार च्या अध्यक्षा श्रीमती अर्चना गोंधळेकर व साकार चे कर्मचारी हजर होते. साकार च्या अध्यक्षा श्रीमती अर्चना गोंधळेकर यांनी आलेल्या सर्व पाहुण्यांचे आभार मानले व पुन्हा संस्थेला भेट देण्याचे आवाहन केले.




**जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय येथील अधिकारी व कर्मचारी यांनी मिळून संस्थेतील बालकांसाठी भेट स्वरुपात ड्रायर दिले. ते स्वीकारतांना संस्थेच्या अध्यक्ष ॲड. अर्चना गोंधळेकर**

## ४. संस्थेतील मुलांसाठी विशेष शिक्षण

संस्थेतील ०३ ते ०६ वर्ष वयोगटाच्या बालकांसाठी २०२१ - २०२२ या वर्षी विशेष उपक्रम राबविला. बालकांचा मानसिक, बौध्दीक आणि सामाजिक विकास साधून शिक्षणात गति प्राप्त करणे, हा उददेश या उपक्रमाचा होता. यात बौध्दीक खेळांवर भर देण्यात आला. तसेच बालकांकडुन विविध चित्रकला, त्यात रंग भरणे व बालकांव्दारे विविध व्यायाम करवून घेतले. मुलांसाठी, चाईल्ड डेव्हलपमेंट ॲण्ड लर्निग सेंटर गोल्ड - गिफट ऑफ लर्निग यांच्या वतीने घेण्यात आले. यासाठी विशेष प्रशिक्षीत शिक्षिक वर्ग नियुक्त करण्यात आला होता.

## ५. बाल गृहातील मोठया बालकांसाठी विशेष शिक्षण

बाल गृहातील ०६ ते १८ वर्ष वयोगटाच्या बालकांसाठी २०२१ - २०२२ या वर्षी संस्थेनी विशेष उपक्रम म्हणून या बालकांना बालगृहातून साकार संस्थेत बोलावून विशेष शिक्षण दिले. कारण शासनाने बाल गृहातील ०६ ते १८ वयोगटातील बालकांना दत्तक प्रवाहात आणले असून या बालकांना विशेष दत्तक संस्थांमार्फत () कायदेशिर दत्तक विधान प्रक्रिया पुर्ण करुन पालकांच्या ताब्यात देण्यात येते. म्हणून या बालकांना योग्य शिक्षण, योग्य शिस्त व योग्य मार्गदर्शन लाभावे म्हणून संस्थेनी या बालकांचे हित बघता हा प्रकल्प राबवण्याचे ठरवले व यात संस्था यशस्वी पण झाली आहे.

# कृतज्ञता

## दत्तक विधान कार्यात साकारला सक्रिय सहकार्य देणा-या आमच्या सर्व भागीदाराचे मनापासून आभार

### सहकार्य करणा-या शासकीय संस्था

| | | | |
|---|---|---|---|
| १ | केंद्रिय दत्तक संसाधन प्राधिकरण (कारा), नवी दिल्ली. | ९ | बाल कल्याण समिती, औरंगाबाद. |
| २ | गृह मंत्रालय, भारत सरकार | १० | एकात्मिक बाल संरक्षण योजना, पुणे. |
| ३ | महिला व बाल विकास मंत्रालय, भारत सरकार | ११ | जिल्हा बाल संरक्षण कक्ष, औरंगाबाद. |
| ४ | महाराष्ट्र शासन | १२ | पोलिस आयुक्तालय, औरंगाबाद |
| ५ | महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. | १३ | सर्व पोलिस स्टेशन आणि तपास पथके, औरंगाबाद. |
| ६ | महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था - सारा, पुणे. | १४ | औरंगाबाद महानगर पालिका, औरंगाबाद. |
| ७ | विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास विभाग, औरंगाबाद विभाग कार्यालय , औरंगाबाद. | १५ | नोंदणी विभाग कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद. |
| ८ | जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय , औरंगाबाद. | | |

### सहकार्य करणा-या सामाजिक व शैक्षणिक संस्था

| | |
|---|---|
| १ | इंडीयन असोसिएशन फॉर प्रमोशन ऑफ अॅडोप्शन अॅण्ड चाईल्ड वेलफेअर (आ.ए.पी.ए.), वरदान, नागपूर |
| २ | इंडीयन असोसिएशन फॉर प्रमोशन ऑफ अॅडोप्शन अॅण्ड चाईल्ड वेलफेअर (आ.ए.पी.ए.), मुंबई. |
| ३ | स्पार्क, पुणे |
| ४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठचे समाजकार्य महाविद्यालय, औरंगाबाद. |
| ५ | सेजल महिला स्वधार गृह, औरंगाबाद. |
| ६ | अनंत भालेराव विद्यामंदिर, औरंगाबाद. |
| ७ | जानकी देवी ग्राम विकास संस्था संचलित समाज सेवा केंद, वाळुज, औरंगाबाद. |

### वैद्यकीय सुविधा पुरविणा-या संस्था

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अमृत बाल रुग्णालय, औरंगाबाद. | ८ | तोतला हॉस्पीटल, औरंगाबाद. |
| २ | महात्मा गांधी मिशन महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद. | ९ | मंगल मेडी सेंटर, औरंगाबाद. |
| ३ | शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद. | १० | दत्ताजी भाले रक्त पेढी, औरंगाबाद. |
| ४ | कमलनयन बजाज हॉस्पीटल, औरंगाबाद. | ११ | चौबे हॉस्पीटल, औरंगाबाद. |
| ५ | एलोरा डायग्नोस्टीक सेंटर, औरंगाबाद. | १२ | स्वरुप मेडीकल व सर्जिकल, औरंगाबाद |
| ६ | माणिक हॉस्पीटल, औरंगाबाद. | १३ | काळे पॅथालॉजी लॅब, औरंगाबाद. |
| ७ | आयकॉन सेंटर, समर्थनगर, औरंगाबाद. | | |

## वृत्तपत्र समूह

| | | | |
|---|---|---|---|
| १ | दैनिक लोकसत्ता, औरंगाबाद | ८ | ए.बी.पी. माझा, औरंगाबाद. |
| २ | दैनिक भास्कर ग्रुप - दैनिक दिव्य मराठी, औरंगाबाद. | ९ | एम.सी.एन., औरंगाबाद. |
| ३ | दैनिक सकाळ, औरंगाबाद | १० | आकाशवाणी, औरंगाबाद. |
| ४ | दैनिक पुण्यनगरी, औरंगाबाद. | ११ | झी टि.व्ही,, औरंगाबाद. |
| ५ | दैनिक लोकमत, औरंगाबाद. | १२ | दैनिक महाराष्ट्र टाईम्स, औरंगाबाद. |
| ६ | दैनिक सामना, औरंगाबाद. | १३ | सोशल मिडीया फोसबुक |
| ७ | द टाईम्स ऑफ इंडिया, औरंगाबाद. | १४ | ९३.४ एफ. एम. रेडीओ |

## सेवा कार्य योगदान

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पल्लवांकुर नर्सरी, औरंगाबाद. | ६ | रेणुका इन्टरप्रायजेस नेसले मिल्क पावडर वितरक, औरंगाबाद. |
| २ | मोहन मुळे, अक्षदा ग्लास ॲण्ड ॲल्युमिनीयम, औरंगाबाद. | ७ | सौ. सोनाली प्रताप धोपटे व श्री. प्रताप धोपटे, वास्तूरचनाकार, औरंगाबाद. |
| ३ | साहिल फोटो स्टुडीओ, औरंगाबाद. | ८ | श्री. इलेक्ट्रिकल्स, औरंगाबाद. |
| ४ | श्री. दत्ता पवार, प्राची कन्सलटन्सी, औरंगाबाद. | ९ | सरस्वती प्रिंटींग प्रेस, मोती कारंजा, औरंगाबाद |
| ५ | सौ.अनुराधा देवळांणकर, औरंगाबाद | १० | सार प्रिंटीग प्रेस, उल्कानगरी, औरंगाबाद |

# इतर सेवा

## बाल आरोग्य सेवा

१. डॉ. प्राची पटेल, मिश्रा चिल्ड्रन हॉस्पीटल, औरंगाबाद.

२. डॉ. रोशनी सोधी, केवल केअर बाल रुग्णालय, औरंगाबाद.

३. डॉ. मंदार देशपांडे, अमृत बाल रुग्णालय, औरंगाबाद.

४. डॉ. मंगेश पानट, ऑर्थोपेडीक तज्ञ, पानट हॉस्पीटल, औरंगाबाद.

५. डॉ. अंतरा देशमुख, फिजिओथेरपीस्ट, औरंगाबाद.

६. डॉ. प्रिया भाले, राजीव स्पीच थेरपी सेंटर, औरंगाबाद.

७. डॉ. मधुरा आन्विकर, मानसशास्त्रज्ञ, आय कॉन, समर्थ नगर, औरंगाबाद.

८. डॉ. मोनाली देशपांडे, आय माईड्स, मानसोपचार तज्ञ, औरंगाबाद.

९. डॉ. उदय कुलकर्णी, स्किनस्पेशालीस्ट, औरंगाबाद.

१०. डॉ. वैशाली अष्टपुत्रे, अष्टपुत्रे दातांचा दवाखाना, औरंगाबाद.

११. डॉ. नळगिरकर, नेत्र तज्ञ, बजाज हॉस्पीटल, औरंगाबाद.

## कायदेविषयक सेवा

१. ॲड.सिध्देश देशमुख
२. ॲड. प्रिया गोंधळेकर

## सनदी लेखापाल सेवा

१. श्री. विवेक अभ्यंकर, चार्टर्ड अकौंटंट, औरंगाबाद.
२. श्री. असीम अभ्यंकर, चार्टर्ड अकौंटंट, औरंगाबाद.

## अंतर्गत लेखा परिक्षण

१. अजिंक्य सावजी, चार्टर्ड अकौंटंट, औरंगाबाद.
२. मिनल औंढेकर, चार्टर्ड अकौंटंट, औरंगाबाद.

## देणगी स्त्रोत

| | | | |
|---|---|---|---|
| १ | डॉ. वीणा पानट, श्रेयनगर, औरंगाबाद | ९ | श्री. सुनिल जबरस |
| २ | श्री. वैभव देशपांडे, इंदौर (म.प्र.) | १० | श्री. अभिषेक मुळे, पुणे |
| ३ | भागवत कॉमर्स क्लासेस, औरंगाबाद. | ११ | श्री. हनुमंत विध्वसं, पुणे |
| ४ | श्री. प्रताप धोपटे, औरंगाबाद | १२ | श्री. शंकर सुभेदार, पुणे |
| ५ | श्री. राहुल पाटिल, पुणे | १३ | फार्म फुड, उस्मानपुरा, औरंगाबाद. |
| ६ | श्री. अनिरुध्द देशपांडे, औरंगाबाद | १४ | पल्लवानकुर नर्सरी, औरंगाबाद |
| ७ | श्री. मनोज औरंगाबादकर, औरंगाबाद | १५ | श्रीमती. लता पानट, औरंगाबाद |
| ८ | सार प्रिटींग प्रेस श्री. अतुल जोशी, औरंगाबाद. | | |

# कार्यकारी मंडळ



ॲड. अर्चना गोंधळेकर
अध्यक्ष



डॉ. निलिमा पांडे
उपाध्यक्ष



सौ. सुचित्रा देशपांडे
सचिव



सौ. राधिका मुळे
कोषाध्यक्ष



सौ.आशा नानीवडेकर
कार्यकारी सदस्य



श्री.सुहास वैद्य
कार्यकारी सदस्य



डॉ. वीणा पानट
कार्यकारी सदस्य



सौ. गौरी शब्दे
कार्यकारी सदस्य



सौ. वैशाली अवलगावकर
कार्यकारी सदस्य

---



डॉ. सविता पानट
माजी अध्यक्ष



सौ. नीलिमा सुभेदार
माजी सदस्य व सल्लागार

# कर्मचारी वृंद

| अ.क. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | श्री. विजय मगरे | व्यवस्थापक |
| २ | श्रीमती स्नेहल काळे | समाजकार्यकर्ती |
| ३ | श्री. तुषार दापके | प्रशासकीय अधिकारी |
| ४ | सौ.ललिता गणकवार | परिचारीका |
| ५ | श्रीमती सुशिला गवई | आया |
| ६ | सौ.छाया वरेकर | आया |
| ७ | सौ. विजया वानखेडे | आया |
| ८ | श्रीमती कल्पना वाघ | आया |
| ९ | सौ. पंचशिला काकडे | आया |
| १० | श्रीमती उषा पठारे | आया |
| ११ | सौ. रुपनंदा दाडंगे | आया |
| १२ | श्रीमती कांचन वेलदोडे | आया |
| १३ | सौ. सुमन जावळे | आया |
| १४ | सौ. माया धारुले | आया |
| १५ | सौ. अनिता खंडाळे | आया |
| १६ | सौ. जयश्री गारोले | आया |
| १७ | सौ. रेखा जाधव | आया |
| १८ | सौ. सुरेखा लोखंडे | आया |
| १९ | सौ. छाया म्हस्के | आया |
| २० | श्रीमती सुनिता जाधव | आया |
| २१ | सौ. नलिनी गणकवार | आया |
| २२ | सौ. शिवशाला खरात | स्वच्छता कर्मचारी |
| २३ | सौ. सिमा गायकवाड | स्वच्छता कर्मचारी |
| २४ | सौ. राखी भोसले | चौकीदार |

*****